सकाळ

# नैसर्गिक शेती मिशनतर्फे शेतकरी प्रशिक्षण

## कृषी विज्ञान केंद्र : पाच तालुक्यांतील शेतकऱ्यांची उपस्थिती

सकाळ वृत्तसेवा

नांदेड, ता. १ : डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र पोखर्णी आणि आत्मा यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच निवासी प्रशिक्षण शिबिर नांदेडला घेण्यात आले. यावेळी नांदेड, किनवट, हिमायतनगर, हदगाव व भोकर या पाच तालुक्यातील शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी केंद्राचे संचालक डॉ. एस. डी. मोरे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून आत्माच्या उपसंचालक माधुरी सोनवणे, कृषी अधिकारी यु. जे. नखाते, श्री. मोकळे, श्री. नरडिले यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते मृदा व बळीराजाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शास्त्रज्ञांमार्फत नैसर्गिक आणि जैविक निविष्ठा यांची प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आली. मान्यवर व कृषी विज्ञान केंद्र येथील शास्त्रज्ञांच्या हस्ते प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.



**नांदेड** : पोखर्णीतील कृषी विज्ञान केंद्र आणि आत्मा यांच्यातर्फे डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले.

केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. देवीकांत देशमुख यांनी प्रास्ताविक भाषणातून नैसर्गिक शेती मिशन : आज आणि उद्या या विषयावर मार्गदर्शन केले. सेंद्रिय आणि नैसर्गिक शेतीबद्दल समज, गैरसमज आणि सेंद्रिय शेती मान्य व वर्ज्य बाबी या विषयावर कृषी विद्यातज्ज्ञ प्रा. संदीप जायभाये यांनी मार्गदर्शन केले. माती व पाणी परीक्षणाचे महत्त्व प्रक्षेत्र व्यवस्थापक प्रा. आर. आर. इंगोले तसेच नैसर्गिक व सेंद्रीय शेती पद्धतीनुसार कीड व रोग नियंत्रणासाठी निविष्ठा उत्पादन व वापर या विषयावर पीक संरक्षणतज्ज्ञ प्रा. एम. जी. कल्याणकर यांनी मार्गदर्शन केले.

पशुवैद्य तज्ज्ञ डॉ. एम. एन. अंभोरे यांचे नैसर्गिक शेतीमध्ये पशुधनाचे महत्त्व, आंतरराष्ट्रीय सेंद्रिय निरीक्षक हर्षल जैन यांनी नैसर्गिक व सेंद्रिय प्रमाणीकरण मानके आणि सेंद्रिय शेतमाल विक्री व्यवस्थापन आणि ब्रँड विकसित करणे यावर मार्गदर्शन केले. हवामान बदल आणि हरितक्रांती परिणाम सेंद्रिय पद्धतीने भाजीपाला लागवड या विषयावर वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. डी. ए. देशमुख यांनी तर सेंद्रिय परसबाग विषमुक्त अन्न आणि रासायनिक घटकांचे मानवी आरोग्यावर होणारे दुष्परिणाम या विषयावर गृह विज्ञान तज्ज्ञ प्रा. अलका पवळे पाटील यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

Nanded, Nanded-Today
02/03/2024 Page No. 3